# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.७५७ दिनांक २९.१०.२०२०

## पालघर पोलीसांकडुन जुगार खेळणा-या १९ आरोपीतांवर कारवाई

दिनांक.२७/१०/२०२० रोजी २२.०० वाजताचे सुमारास मनोर पोलीस ठाणे हद्दीत रुम क्र.१०६ प्राईड इंडिया शान कॉम्प्लेक्स, मस्ताननाका, मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.०८, मनोर, ता.जि. पालघर येथे काही इसम जुगार खेळत असल्याची गुप्त बातमी मा.पोलीस अधीक्षक,पालघर श्री.दत्तात्रय शिंदे यांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे मा.पोलीस अधीक्षक यांच्या आदेशाने पोलीस पथक तयार करुन सदर ठिकाणी छापा टाकला असता यातील आरोपीत क्र.१ ते १९ नामे १) दिपक तुळशीदास ठक्कर, रा.३६/बी, स्नेहप्रभा (लक्ष्मी सदन), शिवाजीनगर, वागळे इस्टेट, मुलुंड चेकनाका, ठाणे (पश्चिम), ता.जि.ठाणे ४००६०४, २) कमलेश दिनेश ठक्कर, वय-४७ वर्षे, रा.के.व्ही.ओ. ऑफीससमोर, ५, भागिरथीनिवास, गणेशगावडेरोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०००८० ३) अमर बोरीवली, ४) हरेश बोरीवली ५) प्रकाश विलेपार्ले ६) अरुण दुबे बोरीवली ७) प्रशांत दहिसर ८) धमा कांदिवली ९) घाटकोपर बुकी १०) हर्ष कांदिवली ११) पार्थ कांदिवली १२) विशाल बोरीवली १३) आशिष बोरीवली १४) महेश रोहित बोरीवली १५) मयुर बंगालीया १६) इब्राहिम दहिसर १७) अभिषेक १८) टाईमस स्पोर्टस १९) Black Phn यांनी आपसांत संर्पक करुन स्वत:च्या फायदयाकरीता त्यांच्या कब्जातील मोबाईल फोनमध्ये ORDS EXCH, DIAMOND EXCH, www.Lotusbook365.com, galaxyexch9.com, TIMEXSPORT, www.lotusbook247.bet या ॲप्लीकेशनचा तसेच व्हॉट्सॲप चार्टीगचा इंटरनेटच्या सहाय्याने वापर करुन टीव्हीवर स्टार स्पोर्ट्स वन या चॅनलवर सुरु असलेल्या सन रायझर्स हैद्राबाद विरुध्द दिल्ली कॅपीटल या लाईव्ह टी-२० क्रिकेट मॅचवर क्रिकेट बेटींग हा जुगार खेळत व खेळवित असतांना मिळुन आले. आरोपीत यांचे ताब्यातुन ५४००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. म्हणुन मनोर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. II १८६/२०२० मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे. सदर गुन्हयातील आरोपी नं. १ व २ यांना दि.२८/१०/२०२० रोजी ०३.३२ वा. अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस अधिक्षक, पालघर श्री.दत्तात्रय शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/श्री. शिवाजी पाटील, नेमणुक आर्थिक गुन्हे शाखा, पालघर, पोलीस उपनिरीक्षक/प्रताप दत्तात्रय भोस, नेमणुक आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस उपनिरीक्षक/अभिजित टेलर, नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांनी व स्थानिक गुन्हे शाखा, पालघरचे पोलीस कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner